# डोंगरी पोलीस ठाणे

सविनय सादर,

फिर्यादी श्री. प्रकाशनारायण जाधव, वय ४० वर्षे, धंदा—व्यवसाय,रा.ठी.रूम नं.१६, बिल्डींग क्र.७, उमरखाडी, मुंबई यांची फेसबुकद्वारे मर्सीग्रेस या अमेरिकन महिलेशी ओळख झाली होती. सदर महिलेने फिर्यादी यांचेशी चॅटिंग करताना अमेरिकन मिलीटरीमध्ये कॅप्टन या पदावरअसून सध्या अफगानिस्तान येथे पोस्टिंगकरिता असल्याची फसवणूक केली होती.

फिर्यादी यांना मर्सीग्रेसही व्हॉटस्अप नंबर 1)+44-7466711286, 2) +44–7448048217, 3)+44–7438506340 या क्रमांकावरून संपर्क साधत असे. त्याचदरम्यान मर्सीग्रेस या महिलेने तिच्याकडे आठलाख अमेरिकन डॉलर असल्याचे सांगून भारतात शॉपिंग मॉल सुरू करण्याची योजना असल्याचे सांगितले.त्याचवेळी फिर्यादी यांच्याकडेही पैसे असल्याने फिर्यादी देखील स्वत:चे पैसे गुंतवण्यास तयार झाले मर्सीग्रेस यांनी त्यांची रक्कम भारतात पाठवित असल्याचे सांगून मर्सीग्रेसहिने चॅटिंगद्वारे इसम नामे २) जॉनकेनेडी, मो.क्र. 7838024194 यांचा मो. क्रमांक दिला होता. सदरची रक्कमेची दिल्ली एअरपोर्ट येथे कस्टमक्लिअरन्स होत नसल्याचे सांगून जॉनकेनेडी व एक अन्य महिला अनिता चौधरी हिचा मो. क्र. 8929901535 यावरून संपर्क साधून कस्टम क्लिअरन्ससाठी फिर्यादी यांना फसवणूक करून रक्कम भरण्यास सांगतले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी मर्सीग्रेस, जॉनकेनेडी व अनिता चौधरी यांना संपर्क साधून वेगवेगळया पाच बॅक अकाउंट व एक पेटीम अकाउंटमध्ये वेळोवेळी रक्कम रू. ३९,८०,०००/— एनईएफटीद्वारने भरली होती. त्यानंतर फसवणूक करणारे इसमांचे सर्व मोबाइल क्रमांक बंद झाल्याने फिर्यादी यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने दिलेल्या तक्रारीवरून गु.र.क्र. १५४/२०२० कलम ४१९, ४२०,३४ भादविसह कलम ६६(क),६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा नोंद करण्यात आल्यानंतर आरोपींविषयी काहीही माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे सदरचे आरोपी हे सायबर गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांची ओळख पटविणेकरिता तपासी अधिकारी पो.नि. शशीकांत पाडावे व तपासीपथक स.पो.नि. प्रकाशलिंगे, म.पो.उ.नि. द्वारकापोटवडे व पो.शि.क्र.०६१८६५/करपाते यांचेकडूनखालील नमूद प्रयत्न करण्यात आले.

१) फिर्यादी यांनी त्यांची रक्कम भरलेले पाचही बॅकअकाउंट व एक पेटीमअकाउंट यांचे के.वाय.सी. व अकाउंटस्टेटमेंट प्राप्त करण्यात आले.

२)अकाउंट स्टेटमेंटचा अभ्यास केल्यानंतर सदरची रक्कम ही पुन्हा वेगवेगळया अकाउंटवर्ग झाल्याचे दिसून आल्याने सदरची रक्कम ज्यावेगवेगळया अकाउंटला गेली अशा वेगवेगळया ६५ बॅकअकाउंटचे अकाउंटस्टेटमेंट व के.वाय.सी. मागविण्यातआले व त्यांचा अभ्यास करण्यात आला.

३) तसेच सदरची रक्कम दल्ली येथील वेगवेगळया एटीएमद्वारे काढण्यात आल्याने तेथील बॅकांना संपर्क साधून त्यांच्याकडून एटीएमसेंटरचे फुटेज प्राप्त करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ९ ठिकाणच्या एटीएमसेंटरचे फुटेज प्राप्त केले.

४) सदर न एटीएमसेंटच्या फुटेजमध्ये एकच इसम प्रत्येक ठिकाणी रक्कम काढण्यास येत असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे सदरचा इसम हा गुन्हयातील मुख्य आरोपींचा साथीदार असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे सदर इसमाचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक हे दिल्ली येथे पाठविणे आवश्यक झाले होते.

५) पेटीएमद्वारे पाच मोबाइल कमांक यांचे रिचार्ज झालेले होते. सदरचे रिचार्ज झालेले मोबाइल कमांक हे आरोपीचे असण्याची शक्यता वाटू लागल्यानेत्यांची देखीलसविस्तरमाहितीमागविण्यातआलीहोती.

६) अशाप्रकारे प्राप्त झालेले मोबाइल कमांकांची माहिती, बॅक खातेधारकांची माहिती, पेटीएमद्वारे प्राप्तमाहिती यांचापो.नि. पाडावे, स.पो. नि. लिंगे व म.पो.उ.नि पोटवडे यांचेकडून सखोल अभ्यास करण्यात आला.

७) पोलीसअधिकारी व अंमलदार यांचे पथक आरोपी यांना निष्पन्न करून त्यांचा शोध घेण्याकरिता नॉर्थवेस्ट दिल्ली, साउथवेस्ट दिल्ली, नरेला, गोएलाडेअरी, दिल्ली येथून जाउन गोपनीयरित्या आरोपीविषयी माहिती घेतलीहोती. परंतु मुख्य आरोपी याविषयी माहिती मिळून न आल्याने पोलीस पथक ही उपलब्ध माहिती घेउन पुन्हा मुंबई येथे आले.

८) मुंबई येथे पोलीस ठाण्यास परत येउन त्यांनी वरिष्ठांशी चर्चा करून मार्गदर्शन घेउन सखोल अभ्यास करून पोलीसअधिकारी व अंमलदार असे सातजणांचा पथकदिल्ली येथे पुन्हा जाउन त्यांनी दिल्ली येथून वेगवेगळया भागातून तीनवेगवेगळी पथके तयार करून सहाभारतीय आरोपी व एक नायजेरीयन आरोपी असे एकूण सात आरोपींना पळून जाण्याची कोणतीही संधी न देता कमी मनुष्यबळात ताब्यात घेउन अटक केली.

९) अशा प्रकारे दिनांक २९/१०/२०२० ते दि. ०३/११/२०२० रोजीच्या दरम्यान दिल्ली येथे राहून कमी मनुष्यबळात व प्रतिकूल परिस्थितीत आरोपी यांना अटक करून मुंबई येथे आणण्यात आले व सदर गुन्हा उघडकीस आणला. तसेच सदर गुन्हयात एकूण रक्कम रू. ५,०७,०००/— एवढी रक्कम आरोपींकडून हस्तगत करण्यात आलेली असून सायबर गुन्हे करणारे टोळीचा छडालावून आंतरराज्यीय गुन्हे करणारे टोळीस अटक करून गजाआड केलेले आहे.

१०) सदर गुन्हयातील आरोपींविरूध्द विहीतवेळेत दि. २८/१२/२०२० रोजीदोषारोपपत्र सी.सी. क्र. ९०९/पीडब्लू/२० अन्वये सादर केलेले आहे. सर्व आरोपी हे अदयापही कारागृहात असूनत्यांनी जामीन मिळणेकरिता अर्ज करूनही त्यांना जामीन मिळालेला नाही.